# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे -४

## परिपत्रक

क्र.रा.मं./पापुई-६/उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम/ ३०८८, दि.१४/०६/२०१७

विषय : राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत उच्च माध्यमिक स्तरावरील (लेव्हल-३ व लेव्हल-४) व्यवसाय शिक्षण योजनेतर्गत नव्याने व्यवसाय विषय सुरू करणेबाबत.

संदर्भ: परिपत्रक क्र.रा.मं./पापुई-६/उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम/१८७६, दि.१०/०४/२०१७

राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत राज्यात शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून व्यवसाय शिक्षण माध्यमिक स्तर व शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून उच्च माध्यमिक स्तर योजनेची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. हे संदर्भिय परिपत्रकान्वये यापूर्वी कळविलेले आहे.

सदर व्यावसायिक अभ्यासक्रम हे NSQF (National Skill Qualification Framework) प्रमाणे पंडित सुंदरलाल शर्मा सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ व्होकेशनल एज्युकेशन (PSSCIVE) भोपाळ यांचे मान्यताप्राप्त असल्याने शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त शासन आदेशानुसार हे व्यावसायिक अभ्यासक्रम इ.११वी आणि इ.१२ साठीच्या नियमित चार Elective subjects पैकी १ विषय वगळून व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील १ विषय घेता येईल. तथापि, जे विद्यार्थी व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील विषयासह इयत्ता ९ वी आणि इ.१० वी उत्तीर्ण असतील अशाच विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी आणि इ.१२ वी साठी व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील विषय घेऊन परिक्षेस प्रविष्ठ होता येईल.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत केंद्र शासनातर्फे मंजूरी मिळालेले खालील विषय इयत्ता ११ वी साठी शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून सुरु करण्यात आले असून २०१७-२०१८ मध्ये इयत्ता १२ वी साठी सुरू करण्यात येत आहेत. सुरू करण्यात येणारे विषय खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | विषय व सांकेतीक क्र. |
|---|---|
| १. | Automobile Service Technician (E-1) |
| २. | Multi Skill Technician (General Engineering) (E-2) |
| ३. | Multi Skill Technician (Electrical) (E-3) |
| ४. | Multi Skill Technician(Gardening, Landscaping & Nursery Management) (E-4) |
| ५. | Automobile Service Technician (with bridge course) (E-5) |
| ६. | Multi Skill Technician (Food Processing & Preservation) (E-6) |
| ७. | Retail Sales Associate (E-7) |

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यांच्या पत्रानुसार कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेमध्ये इ.११वी मध्ये प्रवेशित होणाऱ्या व इ.१०वी मध्ये उपरोक्त नमूद विषय मुख्य विषय घेऊन इ. १०वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना उपरोक्त नमूद विषयांमधील **Level-३ चे विषय, इ. ११वी व Level-4 चे** विषय इ.१२ वी च्या विषय योजनेप्रमाणे ४ वैकल्पिक विषयांपैकी १ विषय म्हणून निवडता येतील. त्यामुळे इ. ११ वी व १२ वी च्या विषय योजनेमध्ये या विषयांचा समावेश वैकल्पिक विषय म्हणून करण्यात येत आहे. तसेच ''मल्टी स्किल फाउंडेशन कोर्सच्या'' विषयासाठी इयत्ता १० वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी मध्ये Multi Skill Foundation Course च्या अंतर्गत येणाऱ्या विषयांतून १ विषय निवडण्याची मुभा राहील. इ. १० वी मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी उपरोक्त विषयातील व्यवसाय विषयापैकी विषय निवडला नसेल तर त्यांना इ. ११ वी मध्ये या विषयाची निवड करता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत व्यवसाय शिक्षण उच्च माध्यमिक स्तर या योजनेंतर्गत इ.११ वी साठी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये लेव्हल-३ म्हणून अंमलबजावणी सुरु झालेली असून इ. १२ वी साठी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून लेव्हल-४ म्हणून सुरू होत आहे. या विद्यार्थ्यांची इ. १२ वी ची प्रथम परीक्षा मंडळामार्फत फेब्रुवारी/मार्च २०१८ मध्ये होणार आहे. ज्या उच्च माध्यमिक शाळेमध्ये सदर विषय सुरु आहे त्या उच्च माध्यमिक शाळांनी विषय मान्यता घेण्याची कार्यवाही करावी.

उपरोक्त विषयाचे अभ्यासक्रम पंडित सुंदरलाल शर्मा सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ व्होकेशनल एज्युकेशन (PSSCIVE) भोपाळ या संस्थेचे मान्यताप्राप्त असल्याने शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे. सदर अभ्यासक्रम PSSCIVE या संस्थेच्या www.psscive.nic.in या संकेत स्थळावर व मंडळाच्या **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. ज्या उच्च माध्यमिक शाळेत हे विषय सुरु करण्यास राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यांनी परवानगी दिलेली आहे त्यांनी इ. १२ वी बाबतची कार्यवाही खालील प्रमाणे करण्यात यावी.

इयत्ता १२ वी मूल्यमापन योजना: लेखी परीक्षा - पेपर-१ वेळ: ३ तास गुण: ८०

प्रात्यक्षिक परीक्षा- गुण: ७०

लेखी परीक्षा - ३० गुण (८० गुणांची परीक्षा घेऊन ३० गुणांत रुपांतर करणे)
प्रात्यक्षिक परीक्षा - ५० गुण
प्रकल्प व अंतर्गत मूल्यमापन - २० गुण
एकूण - १०० गुण.

| S.No. | Method of Assessments | Weightage (Max. Marks) | Examination Conducted by |
|---|---|---|---|
| 1. | Written Test | 30 | M S B Of Sec & H Sec Education |
| 2. | Practical Test | 30 | Concern Sector Skill Council |
| 3. | Oral Test | 10 | External - Sector Skill Council |
| 4. | Direct Observation | 10 | External - Sector Skill Council |
| 5. | Project Work | 10 | Internal - Junior College |
| 6. | Term Work/Journal | 10 | Internal - Junior College |
| | Total: | 100 | |

उपरोक्त विषयांचे प्रश्नपत्रिका आराखडे विषय तज्ञांकडून अंतिम केले असून तेही मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

शै.वर्ष.२०१७-१८ मध्ये हे विद्यार्थी इ. १२ वी साठी प्रविष्ट होतील व त्यांची इ. १२ वी ची प्रथम परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०१८ मध्ये मंडळामार्फत आयोजित केली जाईल. हे व्यावसायिक विषय इ.११ वी व १२ वी साठी उच्च माध्यमिक शाळेचे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेनूसार इलेक्टीव्ह विषयास पर्याय म्हणून राहणार असल्याने इतर विषयांप्रमाणे याचे गुण एकूण गुणात समाविष्ट राहतील. **मंडळाच्या नियमानुसार या विषयांना विभागीय मंडळाची विषय मान्यता घेणे आवश्यक राहील.** सदर विषयास इ.११ वी व १२ वी चा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी आठवडयास १२ तासिका राहतील. त्यातील ६ तासिका वेळापत्रकात तर उर्वरीत तासिका वेळापत्रकाबाहेर राहतील याचे संबंधित उच्च माध्यमिक शाळांनी नियोजन करावे.

तरी उपरोक्तप्रमाणे ज्या उच्च माध्यमिक शाळांमध्ये राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाअंतर्गत NSQF प्रमाणे लेव्हल-३ व ४ चे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत. त्याप्रमाणे उच्च माध्यमिक शाळा प्रमुखांनी कार्यवाही करावी सदर परिपत्रक संबंधित उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांचे निदर्शनास आणून शाळांच्या सूचना फलकावर लावण्यात यावे व केलेला कार्यवाहीचा अहवाल विभागीय मंडळामार्फत सादर करावा.

ठिकाण : पुणे - ४११००४
दिनांक : १८/०६/२०१७

सचिव,
महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे - ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,नागपूर विभागीय मंडळ,नागपूर--४४० ००१
पत्र क्र.नाविमं / संशोधन / ३७६५
नागपूर,दिनांक १३/०७/२०१७

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली व गोंदिया.

उपरोक्त राज्य मंडळाच्या परिपत्रकाची नोंद घेवून,विद्यार्थी,संबधित शिक्षक,यांचे निदर्शनास आणून दर्शनी भागावर सचना फलकावर लावण्यात यावे.

विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.